**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्तविभाग**

**राष्ट्रीय बातमीपत्र**

**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः10.02.2025** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

छत्तीसगढमध्ये 31 नक्षलवादी ठार

पंतप्रधान आज करणार परिक्षा पे चर्चा

मणिपूरचे मुख्यमंत्री एन बीरेन सिंग यांचा राजीनामा

आणि

भारत आणि इंग्लंड क्रिकेट सामन्यात भारताचा विजय, मालिकाही जिंकली

**छत्तीसगढ**

छत्तीसगढमधील बीजापूर जिल्ह्यात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत काल 31 नक्षलवादी ठार झाले आणि 2 जवान शहीद झाले. बीजापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यानाच्या जंगलात मोठ्या संख्येने नक्षलवादी उपस्थित असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दल, विशेष कार्य दल आणि बस्तर फायटर यांच्या संयुक्त पथकानं शोधमोहिम राबवून ही कारवाई केल्याचं बीजापूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक डॉ. जितेंद्र यादव यांनी सांगितलं. घटनास्थळावरून एके-47, सेल्फ-लोडिंग आणि इन्सास रायफल्ससह बॅरल ग्रेनेड लाँचर आणि इतर शस्त्रे आणि स्फोटकं जप्त करण्यात आली आहेत. या घटनेसंदर्भात केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी, सुरक्षा दलांनी केलेली ही कामगिरी म्हणजे भारताला नक्षलवादमुक्त करण्याच्या दिशेनं मोठं यश आहे अशी प्रतिक्रिया समाजमाध्यमावरून व्यक्त केली आहे. या संदेशात त्यांनी चकमकीत वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबियांप्रती त्यांनी सहवेदना व्यक्त केली आहे. देश या दोन वीर जवानांचा सदैव ऋणी राहील, असंही शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**परिक्षा-पे-चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता परिक्षा पे चर्चा या कार्यक्रमांत विद्यार्थी, पालक आणि शिक्षकाशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 8 वा भाग आहे. परिक्षेची तयारी, तणावाचं व्यवस्थापन आणि वैयक्तिक विकास या विषयावर ते मार्गदर्शन करतील. आकाशवाणी आणि दूरदर्शन, स्वयम, स्वयमप्रभा आणि पीएमओ युट्यूब तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या समाजमाध्यमावीरल सर्व वाहिन्यांवरुन प्रसारित करण्यात येईल. विविध राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील 36 विद्यार्थ्यांची पंतप्रधानांशी थेट संपर्कासाठी निवड करण्यात आली आहे. एकत्रित शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक जनआंदोलन उभं करण्यात आलं असून एकंदर 5 कोटी जण यात सहभागी झाले आहेत. जीवनावश्यक तत्वांचं महत्व सांगण्यासाठी यावर्षीच्या कार्यक्रमांत विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

**मणिपूर**

मणिपूरमधील राजकीय अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मणिपूरचे मुख्यमंत्री एन बीरेन सिंग यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांनी आपला राजीनामा राज्यपाल अजय कुमार भल्ला यांना सुपूर्द केला. 2017 मध्ये मणिपूरमध्ये भाजप सत्तेत आल्यापासून ते भाजप सरकारचे नेतृत्व करत आहेत. एन. बिरेन सिंह भाजप ईशान्य प्रभारी संबित पात्रा यांच्यासह काल दुपारी इम्फाळला पोहोचले, तिथे त्यांनी पक्षाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचीही भेट घेतली. त्यानंतर मुख्यमंत्री सचिवालयात सत्ताधारी पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली आणि त्यानंतर त्यांनी राज्यपालांना आपला राजीनामा सादर केला. दरम्यान, मणिपूर विधानसभेचे अधिवेशन आजपासून सुरू होणार आहे. एन. बिरेन सिंह काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

**पंतप्रधान फ्रान्स दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दुपारी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. फ्रान्सच्या दौऱ्यात पंतप्रधान उद्या होणाऱ्या कृत्रिम प्रज्ञा कृती परिषदेत सहअध्यक्ष म्हणून सहभागी होतील. कृत्रिम प्रज्ञेच्या वापरासाठी नैतिक आणि जबाबदार मार्गदर्शक सूचना तयार करणं यावर परिषदेत भर दिला जाणार आहे. मार्सेली इथल्या नवीन भारतीय वकीलातीचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. भारत - मध्य आशिया – युरोप आर्थिक

कॉरीडोरसाठी ही वकीलात महत्त्वपूर्ण आहे. पंतप्रधान फ्रान्सच्या दौऱ्यात अनेक द्विपक्षीय बैठका, व्यावयासिकांसोबतच्या चर्चांमध्ये सहभागी होणार असून आंतरराष्ट्रीय थर्मोन्यूक्लीअर एक्सपरिमेन्टल रिऍक्टर या संस्थेला भेट देणार आहेत.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला भेट देणार आहेत. राष्ट्रपती त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान आणि पूजा करणार आहेत. प्रयागराजमधल्या अक्षयवत आणि बडे हनुमान मंदिरालाही भेट देतील. तसंच डिजिटल महाकुंभ अनुभव केंद्राला भेट देऊन त्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने महाकुंभ मेळ्याची व्याप्ती जाणून घेतील.

दरम्यान, आतापर्यंत 43 कोटींपेक्षा जास्त भाविकांनी महाकुंभ मेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केलं आहे. मकर संक्रांत, मौनी अमावस्या आणि वसंत पंचमीचं अमृत स्नान झाल्यानंतर अजूनही भाविकांचा महाकुंभला भेट देण्याचा उत्साह कायम आहे. येत्या 26 तारखेपर्यंत प्रयागराज इथं हा महाकुंभ उत्सव सुरू राहील.

**राजनाथ-सिंग**

एअरो इंडिया शो हा भारताची संरक्षण क्षेत्रातील ताकद दर्शवणारा नसून युवा पिढीला नवोन्मेषाची आणि मोठी स्वप्न बघण्याची प्रेरणा देणारा आहे असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल पत्रकारांशी बोलताना सांगितलं. या प्रदर्शनाच्या उद्घाटनापुर्वी ते बोलत होते.

हिंदूस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या उत्पादन विभागालाही काल त्यांनी भेट दिली. यावर्षीच्या एअरो इंडिया शोमध्ये नव्वद देशांचे 900 हून अधिक विविध विभागातील सदस्य आणि 70 हून अधिक संरक्षण उत्पादक कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सहभागी झाले आहेत. याबरोबरच 70 पेक्षा अधिक विमानांची उड्डाण प्रात्याक्षिकं आणि 30 विमानांचं स्थिर रुपातील प्रात्याक्षिक तसंच इतर संरक्षण सामग्रींचा प्रदर्शानात सहभाग असणार आहे.

AERO India 2025 या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल फिजीचे संरक्षणमंत्री पिओ तिकोदोनदुआ यांची बेंगलुरु इथं भेट घेतली. भारत फिजीदरम्यान संरक्षण सहकार्य वाढवण्यासाठी एका कृतीदलाची स्थापना करण्याबाबत सहमती झाल्याचं त्यांनी सांगितलं. दक्षिण सुदानचे संरक्षणमंत्री लेफ्टनंट जनरल चोल थांग जे बलोक यांचीही सिंग यांनी काल भेट घेतली.

**गाझा**

गाझापट्टीतील नेटझरीम कॉरीडोरमधून इस्त्रायली संरक्षण दलानं माघार घेतली आहे. इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युध्दबंदीच्या पार्श्वभूमी ही दलं मागे फिरली आहेत. दरम्यान या भागात सामान्य नागरिकांना स्थिरावण्याच्या उद्देशानं पॅलेस्टिनी पोलीसांनी या भागाचा ताबा घेतला आहे.

**भारत आणि इजिप्त**

भारत आणि इजिप्त दरम्यान आजपासून 23 फेब्रुवारीपर्यंत "Cyclone 2025" या एकत्रित संरक्षण सरावाचं आयोजन करण्यात आलं आहे. राजस्थानमधील महाजन फिल्ड फायरिंग रेंज इथं वाळवंटी प्रदेशात संरक्षण व्यावसायिक कौशल्यं, विशेष संरक्षण दलाची आंतरसंक्रियाशीलता यावर हा सराव केला जाईल

**रेल्वेमंत्री-अश्विनी-वैष्णव**

रेल्वे विभागात नव्यानं 95 हजार पदांची भरती करण्यात येईल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बिहारमधील बेतिहा इथं सांगितलं. नुकत्याच झालेल्या दिड लाख भरतीप्रक्रियेव्यतिरिक्त या जागांची भरती होईल असंही त्यानी स्पष्ट केलं. नमो आणि वंदे भारत रेल्वेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन या रेल्वेगाड्यांचं उद्पादन वाढवण्याचा सरकारचा विचार आहे. बिहारमध्ये सरकार 95 हजार पाचशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यामुळे बिहार रेल्वेक्षेत्रात मोठा बदल अपेक्षित आहेत असंही ते म्हणाले.

**आसाम-परिषद**

आसाममधील गुवाहाटी इथं येत्या 25 आणि 26 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रासाठीच्या दुसरी परिषद अर्थात द अडव्हानटेज आसाम इन्हेस्टमेंट आणि इंफ्रास्टक्चर समिट 2025 च्या पार्श्वभूमीवर आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिश्व शर्मा आजपासून सिंगापूरच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या सिंगापूर दौऱ्यामुळे या परिषदेला आंतरराष्ट्रीय स्तरावर चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

**प्र**

**शासकीय परिषद**

आंतरराष्ट्रीय प्रशासकीय विज्ञान प्रशिक्षण संस्था तसंच प्रशासकीय सुधारणा आणि नागरी तक्रार निवारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणार आहे. केंद्रिय मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन होईल. या पाच दिवसांच्या परिषदेत 55 देशांमधले 240 प्रतिनिधी सहभागी होणार असून साडेतीनशेपेक्षा अधिक शोधनिबंध सादर केले जाणार आहेत.

**नॅशनलगेम्स**

उत्तराखंडमध्ये देहरादून इथं सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या तेजस शिरसे यानं पुरुषांच्या 100 मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावलं आहे.या स्पर्धेमधे महाराष्ट्रानं सर्वाधिक 113 पदकं जिंकली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान काल कटक इथं झालेला दुसरा पन्नास षटकांचा क्रिकेट सामना भारतानं 4 गडी राखून जिंकला. या सामन्यासह भारतानं ही 3 सामन्यांची मालिकाही जिंकली आहे. कालच्या सामन्यात इंग्लंडनं भारतासमोर विजयासाठी 305 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. त्याला प्रत्युत्तर देताना भारतानं 44 षटकं आणि 3 चेंडूत 308 धावा केल्या. भारतातर्फे कर्णधार रोहित शर्मानं 119 धावा केल्या. शुभमन गिलनं 60, श्रेयस अय्यरनं 44 आणि अक्सर पटेलनं नाबाद 41 धावा केल्या. रोहित शर्माला सामनावीर घोषित करण्यात आलं.
या मालिकेतला अंतिम सामना येत्या बुधवारी अहमदाबाद इथं खेळला जाणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार**